**राज्यातील प्रत्येक कुटुंब लखपती करण्याच्या उद्देशाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सिंचन विहिरींच्या अनुदानाची आर्थिक मर्यादा वाढविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन (रोहयो) विभाग,**
**शासन निर्णय क्र. मग्रारो-२०२१/प्र.क्र.१८२(भाग-२)/मग्रारो-१**
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : ५ ऑगस्ट, २०२४.

**वाचा :** शासन निर्णय क्र. मग्रारो-२०२१/प्र.क्र.१८२/मग्रारो-१, दि. ०४ नोव्हेंबर, २०२२.

**प्रस्तावना :-**

राज्यातील प्रत्येक कुटुंब लखपती करण्याच्या उद्देशाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सिंचन विहिरींची कामे गतीने पूर्ण करण्यासाठी (SOP) मानक ऑपरेटिंग प्रक्रिया संदर्भाधीन दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आली आहे. तसेच अनुदानाच्या आर्थिक मर्यादेत रूपये ४.०० लाख इतकी वाढ करण्यात आली आहे. मागील तीन वर्षात (सन २०२१-२२ ते जून २०२४ पर्यंत) २९४९० इतक्या सिंचन विहिरींची कामे पुर्ण झालेली असून १५५१६४ इतक्या सिंचन विहिरींची कामे प्रगतीपथावर आहेत. सद्यस्थितीत मजूरीमध्ये झालेली वाढ व बांधकाम विभागाची चालू दरसुची विचारात घेता अनुदानाच्या आर्थिक मर्यादेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :-**

मनरेगा अंतर्गत वैयक्तिक लाभ म्हणून सिंचन सुविधा या वर्गीकरणांतर्गत शेतकऱ्यांना सिंचन विहिरीचा लाभ देण्यात येतो. या सिंचन विहिरीसाठी सध्या रुपये चार लक्ष इतकी अनुदान मर्यादा आहे. या कामाचे अंदाजपत्रके अकुशल कमीत कमी ६०% आणि कुशल जास्तीत जास्त ४०% याप्रमाणे तयार करण्यात येतात. एका सिंचन विहिरीसाठी जवळपास ९०० अकुशल मनुष्य दिवस निर्मिती होते.

२. दिनांक ०१.०४.२०२४ पासून केंद्र शासनाने मनरेगा अंतर्गत मजूरी दरामध्ये वाढ करून तो रूपये २९७ इतका अधिसूचित केलेला आहे. सदर मजुरी दराच्या ४० % इतका कुशल खर्च हा जवळपास १९८ रुपये इतका अनुज्ञेय आहे. म्हणजेच प्रति मनुष्य दिवस जवळपास महत्तम रुपये ५०० अकुशल व कुशल म्हणून रक्कम अनुज्ञेय करता येवु शकते. या बाबी लक्षात घेता ९०० मनुष्य दिवसासाठी रुपये ४ लक्ष ५० हजार इतका खर्च अपेक्षित असून याशिवाय विहीर कामांमध्ये पाणी उपसणे व इतर अनुषंगिक बाबींसाठी जवळपास रुपये ५० हजार इतकी तरतूद ठेवण्यात येते. बांधकाम विभागाच्या चालू दरसुचीनुसार व केंद्रशासनाच्या दिनांक ०१.०४.२०२४ पासून मनरेगा अंतर्गत लागू झालेले मजुरी दर रक्कम रूपये २९७/- प्रतिदिन विचारात घेऊन, सिंचन विहिरीच्या बांधकामाची सुधारित अंदाजित रक्कम रूपये ४९९४०३/- एवढी येत आहे. यानुसार सिंचन विहिर अनुदान रकमेची कमाल महत्तम मर्यादा रूपये ५ लक्ष करण्यास शासन मान्यता देत आहे.

३. माहे एप्रिल, २०२४ पासून मजूरी दरात झालेली वाढ व बांधकाम विभागाच्या चालू दरसुचीतील वाढ विचारात घेऊन मनरेगा योजनेंतर्गत ज्या विहिरींच्या कामांचे हजेरीपत्रक या शासन निर्णयाच्या

दिनांकाला निर्गमित झालेले नाहीत अशा सर्व विहिरींच्या कामाकरिता रू. ५.०० लक्ष महत्तम इतकी अनुदानाची मर्यादा पुर्वलक्षीप्रभावाने (दिनांक १ एप्रिल, २०२४ पासून) विहित करण्यात येत आहे.

४. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सिंचन विहिरींची कामे करताना दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना विचारात घेण्यात याव्यात. तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे केंद्र शासनाचे २०२४-२५ चे Master Circular मधील मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे. राज्यात विहिर खोदकामाची गती व गुणवत्ता वाढविण्यासाठी सुचना शासनास पाठविण्यात याव्यात.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०८०५१८०८१११९१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJANA PRADEEP KHOPDE

Digitally signed by SANJANA PRADEEP KHOPDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Planning Department, 2.5.4.20=162267a166279e51cd3f1cc6e10b61ce9868a859260375a1bba3e5f88931d998, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5835a30dd240a2d86c82fb33fb5d7bcbf513d6ebbb4eff8873d4e0aecc934db5, cn=SANJANA PRADEEP KHOPDE
Date: 2024.08.08 11:59:55 +05'30'

**( संजना खोपडे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री यांचे खाजगी सचिव
४. राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव
५. मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
६. अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (रोहयो), मंत्रालय, मुंबई-३२
८. आयुक्त, महात्मा गांधी नरेगा आयुक्तालय, नागपूर
९. संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१०. सर्व विभागीय आयुक्त
११. सर्व जिल्हाधिकारी
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१३. सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
१४. सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१५. सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१६. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे, (स्थानिक स्तर) विभाग पुणे
१७. निवडनस्ती (मग्रारो १)